# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 13/12/2021 (सोमवार)

---

## जिल्हा वाहतुक शाखा नागपूर ग्रामीण पोलीस दलातर्फे मोटार वाहन अधिनियम–2019 ची प्रभावी अंमलबजावणी.

महाराष्ट्र शासनाने मोटारवाहन (सुधारणा) अधिनियम 2019 ची अधीसुचना दि. 01/12/2021 निर्गमीत केली असुन त्या अधिसुचने ची अंमलबजावणी दि. 12/12/2021 पासुन पोलीस विभागा मार्फत संपुर्ण राज्यात करण्यात आलेली आहे.

शासनाने मोटारवाहन (सुधारणा) अधिनियम 2019 यांची जिल्हा वाहतुक शाखा नागपूर ग्रामीण तसेच पोलीस स्टेश्न यांचे मार्फत सदर अधिनियमाची नागूपर ग्रामीण जिल्हयात प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात येत आहेत. ग्रामीण जिल्हयातील वाहतुकीचे नियम न पाळणाऱ्या वाहन व वाहन चालकांवर या अधिनियमा व्दारे कारवाई करण्यात येत आहेत.

या अधिनियमा व्दारे जुने दंडाचीरकमे मधे वाढ करण्यात आलेली आहे. काही कलमांमध्ये तडजोड शुल्क न घेता सदर प्रकरणे न्यायालयात दाखल करण्यात येणार आहेत. नागपूर ग्रामीण पोलीस दला तर्फे जिल्हयातील सर्व नागरीकांनी वाहतुकीचे नियम पाळण्याबाबत आवाहन करण्यात येत आहे.

मोटारवाहन (सुधारणा) अधिनियम–2019 नुसार काही मोवाका उल्लंघन प्रकरणातील नवीन दंड खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | हेड | जुना दंड | नविन दंड |
|---|---|---|---|
| 1 | पोलीस आदेशना कारणे | 200 | प्रथम अपराध –500<br>दुसरअपराध व त्यानंतर–1500 |
| 2 | अनाधिकृत वाहन चालक | 200 | 5000 |
| 3 | विना परवाना वाहन चालविणे | 500 | 5000 |
| 4 | परवाना संपुणही वाहन चालविणे | 500 | 5000 |
| 5 | वाहनांची शर्यत लावणे | 2000 | प्रथम अपराध –5000<br>दुसरा अपराध –10000 |
| 6 | विनाकारण हॉर्न वाजविणे | 200 | प्रथम अपराध –500<br>दुसरा अपराध – 1500 |
| 7 | विना विमा वाहन चालविणे | 200 | प्रथम अपराध –2000<br>दुसरा अपराध –4000 |
| 8 | वेग मर्यादेचे उल्लंघन | 1000 | दुचाकी वा तिनचाकी–1000<br>ट्रॅक्टर वाहना संबंधात–15000<br>हलक्या वाहनांना–4000 |
| 9 | फॅन्सी नंबर प्लेट (दादा, नाना, मामा,) | 1000 | प्रथम अपराध – 500<br>दुसरा अपराध –1500 |
| 10 | विना हेल्मेट | 500 | प्रथम अपराध –500<br>दुसरा अपराध –1500 |
| 11 | वाहन चालवितांना मोबाईल फोनवर बोलने | 200 | प्रथम अपराध –<br>दुचाकी–1000 |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | तिन चाकी–2000<br>जड वाहन–4000<br>दुसरा अपराध–10000 |
| 12 | विना सिट बेल्ट वाहन चालविणे | 200 | प्रथम अपराध –500<br>दुसरा अपराध –1500 |
| 13 | धोकादायक वाहन चालविणे | 1000 | प्रकरण न्यायालयात समाविष्ट |

## रेती चोरी करणाऱ्या आरोपी अटक
## स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामिणची कारवाई

दि. 12/12/2021 रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक रामटेक उपविभागात पेट्रोलींग करीत असतांना गोपनीय बतमीदारकडून बातमी मिळाली की, पोलीस ठाणे अरोली हद्दीतील मौजा महालगाव शिवारातील सूर नदीचे पत्रातून ट्रॅक्टरने अवैधरित्या रेती(गौणखनिज) ची चोरी होत आहे. अश्या माहिती वरून स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने महालगाव शिवारातील सूर नदी जवळ सापळा रचून नदीचे पत्रातून प्रत्यक्षरित्या घमेले व फावडे चे सहाय्याने रेती चोरी करणारे आरोपी ट्रॅक्टर चालक– रामरतन फत्तुजी मेश्राम, वय 35 वर्ष, रा. नेरी ता. मोहाडी, जि. भंडारा हा विना परवाना आपले मालकाचे सांगण्यावरून सूर नदीचे पात्रातुन रेती चोरी करून नेतांनी मिळुन आला. सदर ट्रॅक्टर क्र. MH–36/L–2891 ट्रॉली सह कि. 5,00,000/–रु. मध्ये अर्धा ब्रास रेती कि. 2,000/–रु. व 3 घमेले व 3 फावडे कि. 600/–रु. असा एकूण कि. 5,02,600/–रु. रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस हवालदार मदन आसतकर यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. अरोली येथे आरोपीविरुध्द कलम 379, 109 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री. चाबुकस्वार मो.क्र. 9867806415 हे करीत आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक मा. श्री विजयकुमार मगर, अपर पोलीस अधीक्षक राहुल माकणीकर यांचे मार्गदर्शनात पोलिस निरीक्षक श्री अनिल जिट्टावार स्था.गु.शा. यांचे नेतृत्वात सपोनि श्री राजीव कर्मलवार, पोहवा मदन आसतकर, पोशी विपीन गायधने, पोशी अमोल वाघ, पोशी रोहन डाखोरे यांनी पार पाडली.

## चोरी

1) पो.स्टे. मौदा :– अंतर्गत 14 कि.मी. अंतरावरील धानला येथे दिनांक 12/12/2021 चे 08.30 वा. चे 17.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– खुशाल परशुराम मते वय 46 वर्ष रा. धानला ता. मौदा हे 12/12/21 चे 08.30 ते 05.45 वा. दरम्यान गायत्री मंदीर धानला येथील पूजा करण्याकरीता गेले होते. त्यादरम्यान मंदीराचा दरवाजा खोललेला दिसला मंदीरात जावून त्यांनी पाहनी केली असता देवीच्या गळयातील दागिणे ज्यामध्ये 1) एक चांदीचा मूकूट अंदाज 250 मिली कि.10,000/–रु., 2) एक सोन्याची पांन्जाली 2.5 ग्रॅम कि. 7,000/–रु., 3) एक सोन्याचा डोरला 1.5ग्रॅम कि. 4,200/–रु. 4) एक सोन्याचे मनी असलेले मंगळसूत्र 2 ग्रॅम कि. 5,600/–रु. व 5) एक सोन्यो दोन डोरले 1.5 ग्रॅम कि. 4,200/–रु. असे एकूण कि. 31,000/–रू. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 380 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार श्री मंगलवार मो. क्र. 9423219429 हे करीत आहे.

2) पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत इसाब इंडीया कंपनी, एम.आय.डी.सी. कळमेश्वर येथे दिनांक 01/12/2021 चे 10.00 वा. पूर्वी आरोपी नामे– सुरेश खुशालराव पाटील वय 32 वर्षे रा. कोहळी ता. कळमेश्वर हा इसाब इंडीया कंपनी, कळमेश्वर येथे स्टोअर किपर म्हणून नोकरीला आहे. सदर कंपनीचे स्टोअररूम मध्ये COPPER ALLOY BUSH 260 210 260 नावाचे पार्ट ठेवलेले होते. सदर स्टोअर रूमची जबाबदारी ही आरोपी क्र. 1 ची असतांना त्याने त्याचा नातलग आरोपी क्र 2. मिथुन रामचंद्र मडके वय 32 वर्ष रा. मानापूर ता. नरखेड याचे सोबत संगणमत करून कंपनीचे स्टोअरमधील मालाची जबाबदारी आरोपी क्र 1 याचेकडे असतांना दि. 01/12/2021 रोजीचे 10.00 वा. पूर्वी कंपनीचे स्टोअररूम मध्ये प्रत्येकी 20,000/– रूपये प्रती नग याप्रमाणे असलेला COPPER ALLOY BUSH 260 210 260 हे नवीन 03 पार्ट व 10,000/–रू. प्रती नग याप्रमाणे वरील जूने 02 पार्ट असे एकूण 80,000/–रू. किंमतीचे COPPER ALLOY BUSH 260 210 260 एकुण 05 पार्ट चोरून नेले आहे. अशा वर्णनाचे तक्रारवरून पोलीस स्टेशन कळमेश्वर ला गुन्हा दाखल करून तपासावर घेतला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– नितीश नितिनकूमार भावसार, वय 30 वर्षे व्यवसाय असिस्टंट मॅनेजर वर्कशाप इसाब इंडीया कंपनी कळमेश्वर रा. 56 नालंदा 2 मालपूर रोड मोडासा जि. अमरावती, ह.मु. प्लॉट नं 201 पेबल्स 5 नर्मदा कॉलनी काटोल रोड नागपूर यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम 381, 34 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार खडसे मो नं. 9421050370 हे करीत आहे.

## अपघातात मृत्यू

1) पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 7 कि मी अंतरावर चंदा पेट्रोलपंप समोर काटोल येथे दिनांक 08/12/2021 चे 18:00 वा. ते 18.15 वा. दरम्यान बाबाराव लक्ष्मणराव तागडे (मृतक) वय 59 रा येनवा हा घुबडमुट गावावरून चिखली गावी पायी जात असता चंदा पेट्रोलपंप समोर अज्ञात वाहनाने धडक मारल्याने पोन्ही पायाला, डावे हाताला व डोक्याला मार लागुन तोंडातुन रक्त निघुण ते जखमी झाले. उपचाराकरीता त्यांना प्रथम ग्रामीण रूग्णालय काटोल व नंतर रेफर केल्याने नागपुर मेडीकल कॉलेज येथे नेले असता दि. 09/12/2021 चे 01.13 वा. भरती केले. त्यास उपचारा दरम्यान तपासुन दि 09/12/2021 चे 11.15 वा. डॉक्टरांनी मृत घोषीत केले. पो.स्टे कळमेश्वर ला कागदप्त्रा वरून सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– राहुल बाबाराव तागडे वय 36 वर्ष रा. येनवा, ता. काटोल यांचे रिपोर्ट वरुन पो. स्टे. काटोल येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनी श्री आगासे मो. नं. 8486283925 हे करीत आहे.

2) पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 06 कि. मी. अंतरावर मौजा नवेगाव साधु शिवारात येथे दिनांक 11/12/2021 चे 18:30 वा. दरम्यान एमएच– 31/बीबी– 7734 क्रमांकाच्या मारूती 800 कारचा चालकाने आपली कार भिवापुर कडुन उमरेड कडे चालवित येत असतांना विरूद्ध दिशेने उमरेड कडुन भिवापुर कडे रॉंगा साईडने भरधाव वेगाने येणारा एम एच– 12/जी– 1249 क्रमांकाचा सिमेट टॅकरचा चालक आरोपीने मारूती कारचा ड्रायव्हर साईडने धडक मारून अपघात केला. या अपघातात मारूती कारचा चालक प्रविण शेषरावजी सिगणापुरे (मृतक) वय 40 वर्ष रा नागपुर याच्या मृत्युस व एमएच– 40/एटी– 0313 क्रमांकाच्या ट्रॅव्हस बस ड्रायव्हर, कन्डक्टर व 2 प्रंवासी यांना जखमी करून तिन्ही वाहनाचे नुकसान केले.

सदर प्रकरणी सरतर्फ पोलिस हवालदार अरून जयसिंगपुरे पो. स्टे. उमरेड यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 304 (अ), 427 भादंवी. सहकलम 184, 137 ब, 177 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री डोर्लीकर हे करीत आहे

## गळफास लावून मृत्यु

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत लक्ष्मी नगर मौदा येथे दिनांक 12/12/2021 ते 16.15 वा. सुमारास फिर्यादीचे आत्याचा मुलगा जॉज उर्फे स़न्नी ऍथोनी (मृतक) वय 58 वर्ष रा. लक्ष्मी नगर मौदा यांची प्रकृत्ती नेहमी खराब राहत असून त्यांनी आजाराला कंटाळुन त्यांचे राहेत घरी फॅनला नॉयलान दोरीने गळफास घेतल्यानंतर ते मृत अवस्थेत आढळून आले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– लिजो जोस शन आप जोस थोमस, वय 45 वर्ष, रा. पोलकी हाउस छिंदवाडा रोड कोराडी नागपूर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोहवा कुथे मो.क्र. 9764007720 हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यु

पो.स्टे. नरखेड :– अंतर्गत भायवाडी शिवार नरखेड येथे दिनांक 09/12/2021 चे 20.00 वा. ते दिनांक 12/12/2021 चे 08.00 वा. सुमारास यश शेषराव चांदुरकर(मृतक), वय 21 वर्ष रा नरखेड हा मजुरीने गाडी चालवत होता. त्याला कमी रोजगार मिळत आसल्याने आर्थिक परस्थिती बेताची होती. त्यामुळे तो सतत विचारात राहत असल्याचे कारणावरून त्यांने नरखेड शिवारातील अशोक बालपांडे यांचे शेतातील विहरीत उडी घेवुन पाण्यात बुडुन मरन पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– श्रावन श्यामरावजी चाफले, वय 48 वर्ष रा नरखेड यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. नरखेड येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार मसराम मो.क्र. 9422547052 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर